# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६, विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : १३/११/२०२३

# प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगांना दिव्यांग कल्याणकारी योजना विभागाकडून यापूर्वी रु. १०००/- प्रतिमहा प्रोत्साहन अनुदान स्वरूपात देण्यात येत होते.

उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील दिव्यांगासाठी कार्यरत असलेल्या विविध संघटनां मिळणाऱ्या पेन्शनमध्ये वाढ करावी याबाबत महानगरपालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करीत होते. त्यांच्या विनंतीची दखल घेवुन मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. अजीज शेख साहेब यांनी दिवाळी सनाच्यापूर्वी प्रशासकीय ठराव पारित करून प्रतिमहा रु. १०००/- पेन्शन ऐवजी प्रोत्साहन अनुदान रु. ५०० /- ची वाढ करण्यात आली असून यापुढे प्रत्येक दिव्यांगाला प्रतिमाह रु. १५००/- प्रोत्साहन अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे दिव्यांग कल्याणकारी विभागाच्या इतर १७ योजनांना मंजुरी देऊन ठराव मंजूर करण्यात आला, त्यामुळे आगामी वर्षामध्ये विविध योजना राबविणे सोईचे झाले आहे.

विविध संघटनांनी आयुक्त तथा प्रशासक श्री. अजिज शेख, अतिरिक्त आयुक्त श्री. जमीर लेंगरेकर, उप-आयुक्त डॉ. सुभाष जाधव, विभागप्रमुख श्री. राजेश घनघाव यांचे आभार मानले.

१३/११/२३

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.